**ठळक बातम्या**

- भारत आणि कतार यांच्यातला व्यापार येत्या ५ वर्षात दुप्पट करुन २८ अब्ज डॉलरपर्यंत नेण्याचा दोन्ही देशांचा निर्धार

- सहाव्या महाराष्ट्र वित्त आयोगाची स्थापना करायला राज्य मंत्रिमंडळाची मान्यता

- तोंड, स्तन आणि गर्भाशयमुखाच्या कर्करोगाला प्रतिबंध करणाऱ्या लशींची चाचणी सुरू

**आणि**

- राज्यभरात उद्या जय शिवाजी, जय भारत पदयात्रेचे आयोजन

**<><><><><>**

भारत आणि कतार यांच्यातला व्यापार येत्या ५ वर्षात दुप्पट करुन २८ अब्ज डॉलरपर्यंत नेण्याचा निर्धार दोन्ही देशांनी केला आहे. त्यासाठी लवकरच मुक्त व्यापार करार केला जाणार आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि कतारचे आमीर शेख तमिम बिन हमद अल थानी यांच्यात आज नवी दिल्लीत चर्चा झाली. यावेळी दोन्ही देशांनी धोरणात्मक भागिदारी आणि दुहेरी करनिर्धारण टाळण्यासाठीच्या सामंजस्य करारांवर स्वाक्षरी केली. तसंच आर्थिक भागिदारी वाढवणं, पुराभिलेखांचं व्यवस्थापन, क्रीडा आणि युवक व्यवहार क्षेत्रातले संबंध मजबूत करण्यासाठीही यावेळी करार झाले. व्यापार, ऊर्जा सुरक्षा, गुंतवणूक, तंत्रज्ञान या क्षेत्रातले संबंध आणखी दृढ करण्यावर यावेळी चर्चा झाल्याचं परराष्ट्र मंत्रालयाचे सचिव अरुण कुमार चटर्जी म्हणाले.

सकाळी कतारच्या आमीर यांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेऊन चर्चा केली.

भारत आणि कतार बिजनेस फोरमची परिषदही आज झाली. दोन्ही देशांमधले संबंध तंत्रज्ञान, नवोन्मेष आणि ऊर्जा यासारख्या गोष्टींवर अवलंबून असतील, असं केंद्रीय वाणिज्य मंत्री पियूष गोयल म्हणाले. विकसित भारत २०४७ आणि कतार नॅशनल VISION २०३० दोन्ही देशातल्या लोकांच्या आयुष्यात संपन्नता आणेल, असंही ते म्हणाले.

**<><><><><>**

देशातल्या प्रत्येक घटकाच्या हितरक्षणासाठी केंद्र सरकार काम करत असून त्यामुळे देशवासियांच्या जीवनात मोठा बदल झाला असल्याचं प्रतिपादन केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराजसिंग चौहान यांनी केलं आहे. नक्शा, अर्थात नॅशनल जिओस्पेशिअल नॉलेज बेस्ड लँड सर्वे ऑफ अर्बन हॅबिटेशन्स च्या पथदर्शी कार्यक्रमाचं उद्घाटन मध्य प्रदेशात रायसेन इथं केल्यानंतर ते जाहीर सभेत बोलत होते.

या मोहिमेत देशातली २६ राज्यं आणि ३ केंद्रशासित प्रदेशांमधल्या एकूण १५२ नगरपरिषदांच्या हद्दीतल्या भूखंडांचं सर्वेक्षण केलं जाणार आहे. यामुळं जमीन मालकीच्या नोंदी पारदर्शी होतील आणि भविष्यातले तंटे टळतील, असं चौहान म्हणाले.

राज्यातल्या शिर्डी, पंढरपूर, बारामती, बदलापूर, वरणगाव, कन्नड, बुलडाणा, घुग्गुस, खोपोली आणि मुर्तीजापूरचा यात समावेश आहे.

**<><><><><>**

सहाव्या राज्य वित्त आयोगाची स्थापना करायला राज्य सरकारनं आज मान्यता दिली. मंत्रालयात झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत हा निर्णय झाला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक झाली.

म्हैसाळ उपसा सिंचन योजनेतल्या सौर ऊर्जा प्रकल्पासाठी सुमारे सोळाशे कोटी रुपयांची गुंतवणूक करायला मंत्रीमंडळानं मंजुरी दिली. या योजनेतून अवर्षण प्रवण भागात १ लाख ८ हजार १९७ हेक्टर क्षेत्राला सिंचन सुविधा मिळणार आहे. जळगांव जिल्ह्यातल्या चाळीसगावमधल्या वरखेडे लोंढे बॅरेज मध्यम प्रकल्पाच्या पावणे तेराशे कोटी रुपयांच्या तरतुदीलाही सरकारनं मान्यता दिली. यामुळे चाळीसगाव आणि भडगाव तालुक्यातल्या सुमारे ८ हजार तीनशे हेक्टर क्षेत्राला सिंचन सुविधा उपलब्ध होईल. अंमली पदार्थ विरोधी कृती दलासाठी ३४६ नवीन पद निर्मिती करायलाही आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी मिळाली.

विकीपीडियावर छत्रपती संभाजी महाराजांविषयी लिहिलेला आक्षेपार्ह मजकूर काढण्याचे आदेश राज्य सरकारनं सायबर विभागाला दिले आहेत. मंत्रिमंडळ बैठकीनंतर मुख्यमंत्र्यांनी वार्ताहरांशी बोलताना ही माहिती दिली.

**<><><><><>**

महिलांना होणाऱ्या कर्करोगावर प्रतिबंधक लस येत्या पाच ते सहा महिन्यांत उपलब्ध होईल, अशी माहिती केंद्रीय आरोग्य, कुटुंब कल्याण आणि आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी दिली. यात प्रामुख्यानं तोंडाचा, स्तनांचा आणि गर्भाशयमुखाच्या कर्करोगावरच्या लसीचा समावेश आहे.

ते आज छत्रपती संभाजीनगर इथं वार्ताहर परिषदेत बोलत होते. या लसीवरचं संशोधन जवळपास पूर्ण झालं असून चाचण्यांना सुरुवात झाली आहे. लवकरच ही

लस उपलब्ध होईल आणि ९ ते १६ वर्षं वयोगटातल्या मुली लसीकरणासाठी पात्र असतील, असंही जाधव म्हणाले.

तसंच, ३० वर्षांवरच्या महिलांची रुग्णालयांमध्ये तपासणी केली जाईल आणि रोगाचं निदान लवकर होण्यासाठी डेकेअर कर्करोग केंद्रं स्थापन केली जातील, अशी माहितीही जाधव यांनी यावेळी दिली.

**<><><><><>**

काँग्रेसच्या पक्ष संघटनेत यापुढे जनाधार असणाऱ्यांना संधी देणार असल्याचं काँग्रेसचे नवे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी आज स्पष्ट केलं. ते आज मुंबईत प्रदेशाध्यक्ष पदग्रहण समारंभात बोलत होते.

काँग्रेसचा विचार घराघरात पोहोचवून संघटना मजबूत करणं हेच आपलं ध्येय आहे. कामाची पद्धत बदलायची आहे. बदललेली लढाई समजून घेतली पाहिजे आणि त्या दृष्टीनं लढाई लढली पाहिजे. कार्यकर्ता लढाऊ बनवायचा आहे. त्यादृष्टीनं येत्या २५ तारखेनंतर पुढचं धोरण ठरवून काम करणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेनीथला, माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे, माजी मंत्री बाळासाहेब थोरात इत्यादी काँग्रेस नेते यावेळी उपस्थित होते.

संपूर्ण कार्यकारणीत फेरबदल होणार आहेत. राज्यात आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार आहेत त्यासाठी कार्यकर्त्यांनी कामाला लागावं, असं आवाहन चेनीथला यांनी केलं.

**<><><><><>**

नवी दिल्ली इथे होणाऱ्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचं संमेलन गीत नांदेड इथल्या गायिका, संगीतकार आनंदी विकास यांनी संगीतबद्ध केलं आहे.

राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी काल याचं प्रकाशन केलं. या गाण्याविषयी आनंदी विकास म्हणाल्या...

**होल्ड बाईट - आनंदी विकास**

**<><><><><>**

राज्य शासनानं छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्तानं जय शिवाजी, जय भारत या पदयात्रेचं आयोजन केलं आहे. उद्यापासून त्याचा प्रारंभ होणार आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून या पदयात्रेचं उद्घाटन करतील. संपूर्ण राज्यात ३६ जिल्ह्यांमध्ये पदयात्रांचं आयोजन करण्यात आहे. पुणे जिल्ह्यातल्या पदयात्रेत केंद्रीय मंत्री डॉ. मनसुख मांडवीय आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस सहभागी होणार आहेत. ही पदयात्रा पुणे अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या पटांगणापासून ते फर्ग्युसन महाविद्यालयापर्यंत काढली जाईल.

**<><><><><>**

"India's Got Latent" या यू ट्यूब चॅनेलवर तरुण पिढीच्या दृष्टीनं वाईट मजकूर प्रसिद्ध झालेल्या तक्रारीची चौकशी करण्याचे निर्देश राज्य महिला आयोगानं मुंबई पोलिसांना दिले आहेत. दोन वकिलांकडून आयोगाला ही तक्रार मिळाली आहे, असं आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर यांनी आज मुंबईत बातमीदारांना सांगितलं.

**<><><><><>**

सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती सूर्यकांत आणि एन. कोटीश्वर सिंग यांच्या खंडपीठाने यूट्युबर रणवीर अलाहबादीयाला वादग्रस्त टिप्पणी प्रकरणी आज झालेल्या सुनावणीत अटकेपासून संरक्षण दिलं आहे. रणवीर विरोधात अनेक पोलीस ठाण्यांमध्ये गुन्हा दाखल झाला होता. त्या विरोधात रणवीरनं सर्वोच्च

न्यायालयात धाव घेतली होती. रणवीरच्या टिपण्ण्यांवर सर्वोच्च न्यायालयानं ताशेरे ओढले. तसंच त्याला आपला पासपोर्ट पोलीस ठाण्यात जमा करण्याचे आणि न्यायालयाच्या पूर्वपरवानगी शिवाय देश न सोडण्याचे निर्देश खंडपीठानं दिले आहेत.

**<><><><><>**

ऑगस्ता वेस्ट वेस्टलँड हेलिकॉप्टर घोटाळा प्रकरणातला आरोपी क्रिस्टअन मायकेल जेम्स याचा जामीन अर्ज सर्वोच्च न्यायालयानं आज मंजूर केला. या घोटाळ्यात तो मध्यस्थ म्हणून काम करत होता, असा आरोप त्याच्यावर आहे. गेली ६ वर्ष तो कोठडीत असून या प्रकरणाचा तपास अजूनही चालूच आहे. त्यामुळे त्याचा जामीन मंजूर करत असल्याचं न्यायालयानं सांगितलं.

**<><><><><>**

पंजाबमधल्या फरीदकोट इथं खासगी बस नाल्यात पडून आज सकाळी झालेल्या अपघातात पाच जणांचा मृत्यू झाला, तर ३० जण जखमी झाले.

**<><><><><>**

बोलिव्हियातल्या योकल्ला जिल्ह्यात काल झालेल्या बसच्या अपघातात ३० जण ठार झाले. ही बस ८०० मीटर खोल दरीत कोसळली.

**<><><><><>**

वेव्हज अर्थात वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल अँड एंटरटेनमेंट समिट अंतर्गत ट्रेलर मेकिंग स्पर्धेसाठी नोंदणी सुरू झाली आहे. व्हिडीओ पद्धतीचे आशय तयार करणारे किंवा संकलन विषयात आवड असणारे विद्यार्थी तसंच चित्रपट निर्माते या स्पर्धेत सहभागी होऊ शकतील. यासाठी त्यांना नेटफ्लिक्स या ओटीटी माध्यमाच्या व्हिडीओ संग्रहालयाचा वापर करण्याची सुविधाही उपलब्ध करून देण्यात आली

आहे. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी अर्जदारांचं वय किमान १८ वर्षं असणं आवश्यक आहे. ३१ मार्च ही नोंदणीची शेवटची तारीख असून वेव्हजचा कार्यक्रम येत्या १ मे ते ४ मे या कालावधीत मुंबईत होणार आहे.

**<><><><><>**

महिलांच्या प्रिमियर लीग क्रिकेट स्पर्धेत, आज वडोदरा इथं मुंबई इंडियन्स आणि गुजरात जायंट्स यांचा सामना सुरु आहे. मुंबई इंडियन्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा गुजरात जायंट्सच्य ९ व्या षटकात ५ बाद ४३ धावा झाल्या होत्या.

//<><><><><>//